


SHRI DURGA SHIKSHAN SANSTHA, ARJUNI/MORGAON

# SHIVPRASAD SADANAND JAISWAL COLLEGE

(Arts, Commerce & Science)
ARJUNI/MORGAON, Dist – GONDIA
NAAC RE-ACCREDITATION "B" GRADE




## ONE DAY STATE LEVEL INTERDISCIPLINARY SEMINAR

ON

# IMPACT OF GST ON INDIAN ECONOMY: PRESENT & FUTURE

ONE DAY STATE LEVEL INTERDISCIPLINARY SEMINAR
IMPACT OF GST ON INDIAN ECONOMY:
PRESENT & FUTURE

DISCLAIMER

All data, information, views, opinions, tables, figures that are published are the sole responsibility of the authors. Neither the publisher nor the editors in any way are responsible for the same.

ISBN- 978-93-86011-59-6

FIRST EDITION : 2018

Printed By:

Naresh Khapekar

SAI JYOTI PUBLICATION

Teen-nal Chowk, Kasarpura,
Behind Panjivani Market,
Itwari, Nagpur.
Ph. No.: 9764673503, 9923693506
E-mail id: sjp10ng@gmail.com
Website: www.saijyoti.in

PUBLISHED BY

DR. S.D. PATANKAR,
PRINCIPAL
SHIVPRASAD SADANAND JAISWAL COLLEGE,
ARJUNI/MORGAON-441701
E-Mail Id: ssjaiswalcollege @rediffmail.com
Website: www.ssjaiswalcollege.com
Phone no. 07196-220158 Fax:- 07196-220371
Affiliated to Rashtrasant Tukdoji Maharaj Nagpur University, Nagpur

३९. जी एस टी ची वास्तविकता १६४
श्री. सुनिल प्रभाकर घुगल

४०. वस्तु व सेवा करांचे फायदे व तोटे १६८
प्रा. पी.बी.जवादे

४१. जी.एस.टी.ची अर्थव्यवस्थेतील भूमिका १७४
प्रा. जगदीश वाटमोडे

४२. आर्थिक सुधारणांची वजाबाकी: जीएसटी १७६
डॉ. (सौ.) मंजूषा रा. ठाकरे

४३. एक देश एक कर : जी. एस. टी. १८२
प्रा. मुरलीधर एस. नाकाडे

४४. जीएसटी –एक आर्थिक विश्लेषन १८५
प्रा. प्रविन पी. राऊत

४५. जीएसटीचा लघुउद्योगावर होणारा परिणाम १८८
डॉ. सौ. सुनंदा देशपांडे

४६. वस्तू व सेवा कर: कर रचनेतील क्रांती १९२
प्रा. लखन भि. इंगळे

४७. वस्तू व सेवा करांचे भारतीय शिक्षण आणि कल्ली क्षेत्रावरील परिणाम १९७
प्रा.डॉ. सी.पी. साखरवाडे

४८. वस्तु व सेवा कर – एक आढावा. १९९
डॉ. एस.पी. झांबरे

४९. वस्तू व सेवा कराची आवश्यकता व विविध घटकांना मिळणारा लाभ २०२
डॉ. सुनिल शिंदे

५०. वस्तू आणि सेवा कर एक चांगली प्रणाली २०६
प्रा. संगीता अरमरकर

५१. जीएसटी आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम २१०
डॉ. रंजना सुखदेव लांजेवार

५२. कर प्रणाली में नये युग का आरंभ : वसतु व सेवा कर २१४
डॉ. अर्चना बी. जैन

# वस्तू व सेवा कराची आवश्यकता व विविध घटकांना मिळणारा लाभ

डॉ. सुनिल शिंदे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
भिवापूर महाविद्यालय,
भिवापूर

भारतामध्ये १९९१ मध्ये पी.व्ही. नरसिंहराव पंतप्रधान आणि डॉ. मनमोहनसिंग यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला गती देण्याकरीता 'खुल्या दरवाज्याचे धोरेण' स्विकारून आर्थिक सुधारणांच्या नविन पर्वाला सुरवात केली. खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण ही नविन आर्थिक सुधारणांची महत्वाची वैशिष्टे होय. आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेमध्ये जोपर्यंत संपुर्ण यंत्रणा सुधारत नाही किंवा त्यामध्ये बदल होत नाही तोपर्यंत सातत्याने त्या सुरू ठेवाव्या लागतात. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये अशा सुधारणांचा एक महत्वाचा आणि निर्णायक टप्पा पुर्ण होवून देश आर्थिक सुधारणांना सामोरे जात आहे. ह्या सुधारणांचाच एक भाग म्हणून देशामध्ये 'एक देश, एक बाजारपेठ, एक कर' हे उद्दिष्ट ठेवून १ जुर्ले २०१७ पासून मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी आणि वित्तमंत्री श्री. अरून जेटली यांच्या नेतृत्वात जीएसटी ही नवीन करप्रणाली देशाने स्विकारलेली आहे. भारताच्या अप्रत्यक्ष करप्रणालीच्या मांडणीतील हा सर्वात महत्वाचा बदल आहे. संपूर्ण देशामध्ये एक समान अप्रत्यक्ष कराची पध्दती असावी म्हणून वस्तू व सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्याचा निर्णय केंद्र आणि राज्य सरकार यांच्या चर्चेअंती घेण्यात आला. भारतामध्ये आजपर्यंत केंद्र व राज्य सरकारचे विविध अप्रत्यक्ष कर, विविध राज्यामध्ये अप्रत्य करांचे प्रकार व दरामध्ये असलेली भिन्नता, आवश्यक असणाऱ्या पुर्ततेची आवश्यकता, कररचनेच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या व्यावहारीक किचकट अडचणी या सर्वापासून सुटका होण्यासाठी जीएसटी रामबाम उपाय ठरणार आहे. जगभरातील दीडशेहून अधिक देशामध्ये या प्रणालीचा यशस्वीरीत्या स्वीकार झाला आहे. व सदर प्रणाली जगभरात राजस्व गोळा करण्यात यशस्वी झालेली आहे.

## वस्तू व सेवा कर : पार्श्वभूमी

आपल्या देशात मागील १५ वर्षापासून वस्तू व सेवा कर लागू करण्याबाबत विचारमंथन सुरू होते. डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली २००३ मध्ये नेमण्यात आलेल्या 'टास्क फोर्स' ने सर्वप्रथम ही संकल्पना आपल्या अहवालात मांडली. २००६ मध्ये तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणात या संकल्पनेचा उल्लेख केला. या संकल्पनेला गती देण्यासाठी २००९ मध्ये या विषयावरच्या चर्चेसाठीचा एक दस्तावेज जारी करून या संकल्पनेवर विचारविनिमयाची प्रक्रिया सुरू करण्यासाठी राज्याच्या अर्थमंत्र्याची एक समिती नेमण्यात आली. २०११ मध्ये जीएसटी लागू करण्यासंबंधीच विधेयक प्रथम मांडण्यात आलं. ते संसदीय स्थायी समितीकडे पाठविण्यात आले. २०१३ मध्ये समितीने अहवाल दिला. परंतु तोपर्यंत लोकसभा निवडणूकींच्या हालचालीला वेग आल्यामुळे हे विधेयक मागे पडले. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि त्यांनी स्वत: हे विधेयक राष्ट्रहिताच आहे असे सांगुन त्याचा पाठपुरावा करण्यास सुरवात केली. अखेर सरकारने सर्व विरोधी पक्षासोबत विचारविनिमय करून व सामोपचाराचा मार्ग अवलंबून हे विधेयक दोन्ही सभागृहामध्ये पारीत केले

ISBN- 978-93-86011-59-6

**वस्तू व सेवा कर प्रणालीची आवश्यकता**

१) **विविध अप्रत्यक्ष करांपासून सुटका :-** भारतामध्ये वस्तू व सेवा कर लागू होण्यापुर्वी एकाच वस्तूवर विविध अप्रत्यक्ष कराची आकारणी केली जात होती. वस्तूवर एकसमान कर आकारला जात नव्हता उत्पादित वस्तूवर केंद्र सरकारने उत्पादन कर आकारल्यावरही त्याच वस्तूवर विक्री कराची आकारणी केली जात होती. त्यामुळे वस्तू व सेवावर एकच कर असावा ह्याकरीता वस्तू व सेवा कर प्रणालीची आवश्यकता होती.

२) **मूल्यवर्धित कर आकारणीतील अडचणीपासून सुटका :-** वस्तू व सेवा कर प्रणालीपुर्वी राज्य सरकारद्वारे मुल्यवर्धित कराची आकारणी केली जात होती तर उत्पादन शुल्क व सेवा कराची आकारणी केंद्र सरकारद्वारे केली जात होती. कराची स्वतंत्रपणे आकारणी होत असल्याने एका कराची वजावट दुसरा कर भरतांना दिली जात नाही. त्यामुळे मालाच्या किंमती वाढतात. ह्या त्रुटीचे निराकरण ह्या करप्रणालीमुळे होणार आहे.

३) **करांचा भार कमी करण्यास सहायक:-** केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या विविध अप्रत्यक्ष करांच्या आकारणीमुळे वस्तूवरील करांचा बोझा वाढत जातो. त्यामुळे ग्राहकावर अतिरिक्त करांचा भार पडतो. हे सर्व अप्रत्यक्ष कर वस्तू व सेवा कर कायद्यांमुळे नाहिसे होणार असून ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.

४) **एक देश, एक बाजारपेठ व एक किंमत यासाठी आवश्यक :-** वस्तू व सेवा कर प्रणाली अगोदर विविध राज्य सरकारचे वस्तूवरील कराचे दर भिन्न भिन्न असल्यामुळे एकाच वस्तूची किंमत विविध राज्यामध्ये व बाजारपेठामध्ये भिन्न भिन्न असायची त्यामुळे एक देश, एक बाजारपेठ व एक किंमत यासाठी वस्तू व सेवा कर कायद्याची अंमलबजावणी आवश्यक होती.

५) **वस्तू व सेवा करप्रणालीमुळे करामध्ये निश्चितता व अचुकता :-** पुर्विच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करदात्याला एकापेक्षा अनेक कायद्याचे पालन करावे लागत असल्याने कायद्यातील तरतुदी आणि कराचे विवरणपत्र भरतांना अनेक अडचणी येवून त्रास सहन करावा लागत होता. परंतु वस्तू व सेवा करप्रणलीतील सर्व व्यवहार संगणकाद्वारे होणार असल्याने करामध्ये निश्चितता व अचुकता येईल.

**वस्तू व सेवा करप्रणालीत घरगुती वापरातील वस्तूवरील कर**

१ जुर्ले २०१७ ला भारतामध्ये वस्तू व सेवा करप्रणाली लागू झाली असून ही पाच टप्यांची करप्रणाली आहे. काही वस्तूवर शुन्य कर आहे. अन्य वस्तूवर ५, १२, १८ आणि २८ टक्यांपर्यंत कर लागणार आहे. अंमलबजावणीसाठी जीएसटी कौन्सिल व जीएसटी नेटवर्क यांची स्थापना करण्यात आली आहे.

१) **० टक्के कर :-** पॅकबंद न केलेले अन्नधान्य, ताज्या भाज्या, ब्रँडविरहीत आटा, ब्रँडविरहीत बेसन, गुळ, दुध, दही, अंडी, लस्सी, पॅकबंद न केलेले पनीर, ब्रँडविरहीत नैसर्गिक मध, पाम जॅगरी, मीठ, काजळ, फूल भारी झाडू, मुलांचे ड्रॉइंग आणि कलरिंग बुक्स, शैक्षणिक सेवा, आरोग्य सेवा

२) **५ टक्के कर :-** साखर, चहापत्ती, भाजलेल्या कॉफी बिया, खाद्य तेले, स्कीम्ड दूध पावडर, बालकांसाठीचे दुग्धजन्य पदार्थ, पॅकबंद पनीर, काजू, बेदाने, पीडीएस केरोसीन, घरगुती वापराचा एलपीजी, पादत्राने (रू.५०० पर्यंतची), कपडे (रू.१००० पर्यंतची), अगरबत्ती, कॉयर मॅट्रस

ISBN- 978-93-86011-59-6


३) **१२ टक्के :-** लोणी, तुप ,बदाम, फ्रूट ज्यूस, पॅकबंद नारळ पाणी, भाज्या तयार करण्याचे पदार्थ (फळे, शेंगदाने, लोणचे, मुरब्बा, चटणी जाम, जेली यासह अन्य मिश्रणांचे भाग) छत्री, मोबाइल्स

४) **१८ टक्के :-**केस तेल, टूथपेस्ट, साबन, पीस्ता, कार्नफ्लेक्स, सुप, आइसक्रीम, प्रसाधनवस्तू, प्रिंटर्स

**वस्तू व सेवा कराच्या कार्यक्षेत्राबाहेरील वस्तू।**

वस्तू व सेवा करप्रणालीतील सर्व वस्तू व सेवावर कर लावण्याचे प्रावधान वस्तू व सेवाकर विधेयकात आहे. मात्र मद्याचा समावेश वस्तू व सेवा कर प्रणालीत करण्यात आलेला नाही. तसेच कच्चे तेल, डिझेल, पेट्रोल, नैसर्गिक गॅस, विमानाचे इंधन यांचा वस्तू व सेवा करामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. मात्र ठराविक कालावधीनंतर सदर उल्लेखित पेट्रोलियम वस्तू वस्तू व सेवा कर प्रणाली अंतर्गत आणण्याचे प्रावधान करण्यात आलेले आहे.

**वस्तू व सेवा करप्रणालीतील अंतर्भुत कर**




**वस्तू व सेवा कराचा विविध घटकावरील परिणाम**

१) **अर्थव्यवस्थेला होणारा लाभ :-**

तज्ञांच्या मते वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे भारताला १५ अब्ज डॉलर्सची प्राप्ती होणार आहे. कारण ह्या करप्रणालीमुळे निर्यात वाढीस अधिक प्रोत्साहन मिळेल. रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होवून विकासाचा वेग वाढेल. आंतरराज्य व्यापार आणि कर प्रशासनातील सुलभतेमुळे देशामध्ये विदेशी गुंतवणूक आकर्षित होईल. उद्योजक व व्यापाऱ्यांमध्ये असलेल्या करचोरीला आळा बसेल. अर्थविश्लेषकांच्या अंदाजानुसार देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात नविन करप्रणालीमुळे वाढ होईल ह्या करप्रणालीमुळे सरकारचा महसूल वाढेल.

ISBN- 978-93-86011-59-6

२)     सामान्य ग्राहकांना होणारा लाभ :-

तज्ञाच्या मते ह्या करप्रणालीचा सर्वात जास्त लाभ ग्राहकांना मिळणे अपेक्षित आहे ही करप्रणाली लागु झाल्यामुळे ग्राहकांवर पुर्विसारखे अनेक अप्रत्यक्ष कराचे ओझे पडणार नाही. वस्तू व सेवा कर प्रणालीत केंद्र व राज्य दोन्ही कर उत्पादन खर्चावर आकारले जाईल आणि विक्रीच्या वेळी गोळा केले जातील. त्यामुळे वस्तूंच्या किंमती कमी होण्याची शक्यता आहे. एकाच कराच्या दरामुळे देशातील कोणत्याही राज्यात किंमती भिन्न भिन्न राहणार नाही. ग्राहकांना वस्तूवर किती कर दिला आहे. आणि वस्तूचे वास्तविक मूल्य किती आहे याची माहिती होईल. ह्या करप्रणालीमध्ये करव्यवस्थापण सुविधा अतिशय चांगली आहे. करांमध्ये फेरफार शक्य नाही. साठेबाजी, कृत्रिम टंचाई आणि महागाईचा भडका यापासून ग्राहकाना दिलासा मिळेल. ग्राहकांना वस्तू खरेदी व्यवहारातून पारदर्शकतेचा अनुभव येईल.

३)     व्यापारांना होणारा लाभ :-

वस्तू व सेवा कर ही समान करप्रणाली लागू झाल्यामुळे राज्यातील उद्योग आणि व्यापाराला चालना मिळणार आहे. वस्तू व सेवा कर प्रणालीमुळे संपुर्ण भारतभर एकत्रित व्यापार करणे शक्य होणार असून देशाच्या प्रत्येक भागात वस्तूंचा मुक्त पुरवठा करता येणार आहे. त्यामुळे उत्पादन व किंमती अधिक कार्यक्षम होतील. निर्यातकाला त्याने निर्यातीसाठी वापरलेल्या सर्व खरेदी मालावर दिलेल्या कराचा परतावा मिळणार असल्याने तसेच निर्यातीवर कुठलीही करआकारणी होणार नसल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याला आपल्या मालाची किंमत स्पर्धात्मक ठेवता येईल.

## संदर्भ ग्रंथ सूची


१)     वस्तू व सेवा कर एक दृष्टीक्षेप : वित्त विभाग महाराष्ट्र शासन

२)     कामठे प्रविण :'वस्तू व सेवा कर कायदा एक परिचय'' २०१७

३)     गोविंद पटवर्धन : 'असा आहे GST कायदा''

४)     सकाळ ऑनलाइन आवृत्ती : ८ ऑगष्ट २०१६

५)     लोकमत ऑनलाइन आवृत्ती : १ जुलै २०१७

६)     लोकमत ऑनलाइन आवृत्ती : ११ सप्टेंबर २०१७